श्री व्यंकटेश महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ संपन्न

"नवीन शैक्षणिक धोरणातील झालेले बदल स्वीकारून महाविद्यालयाने केलेली प्रगती उल्लेखनीय असून शहराच्या गरजेनुसार महाविद्यालयांमध्ये सुरू केलेल्या कोर्सेसमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागत आहे. इचलकरंजी शहराच्या वाढत्या औद्योगीकरणाकडे विद्यार्थ्यांनी आपले करिअर म्हणून पहावे. विविध उद्योगांची पायाभरणी करून शहराच्या विकासामध्ये सहभागी व्हावे. या कार्यक्रमांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होत असून त्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर आपल्या जीवनात यशस्वी व्हावे." असे प्रतिपादन श्री. नितीन आर. धूत यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयातील वार्षिक बक्षीस वितरण समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी दुसरे प्रमुख पाहुणे श्री. तेजराज एम . सोळंकी यांनी देखील मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून वर्षभरातील महाविद्यालयाच्या यशाचा आढावा घेतला. उपप्राचार्य प्रो. (डॉ) एन. एम. मुजावर यांनी प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. याप्रसंगी संस्था चेअरमन श्री. कृष्णा बोहरा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी विकास चंगेडिया यांची विशेष उपस्थिती होती. महाविद्यालयातील विद्यापीठ गुणवत्ता यादीतील विद्यार्थी , सांस्कृतिक कार्यक्रमातील यशस्वी विद्यार्थी , गुणवंत खेळाडू प्रत्येक अभ्यासक्रमाचे गुणवंत विद्यार्थी , तसेच राज्य व देश पातळीवरील विविध क्षेत्रांमध्ये यश मिळालेले विद्यार्थी यांना बक्षीस वितरण करण्यात आले. ग्रंथालयामार्फत राबवण्यात आलेल्या ' पुस्तक परीक्षण ' स्पर्धेचे देखील बक्षीस वितरण करण्यात आले. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख ए . आय.बाणदार यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. त्यांना महाविद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध समित्यांद्वारे कार्य करून आवश्यक ते सहकार्य केले. याप्रसंगी विद्यार्थी - विद्यार्थिनी त्यांचे पालक व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापिका डॉ. एस.एन. जरंडीकर यांनी केले.

